# बेटी बचाव अभियान अधिक प्रभावीपणे राबवा: मा. महापौर



बेटी बचाव, बेटी पढाओ विषयावर म.न.पा. विद्याथ्र्यांची चित्रकला स्पर्धा विजेत्यांना महापौर यांचे हस्ते बक्षिस वितरण. नागपूर शहरातील मुलीचे प्रमाण वाढविण्याच्या दृश्टीने आणि राज्यातील स्त्रीभृण हत्याचे प्रमाण रोखण्यासाठी शासनानी विविध उपाययोजना सुरू केलेल्या आहे. मा. पंतप्रधान यांनी बेटी बचाव, बेटी पढाओचा संदेश दिला आहे. केंद्र व राज्य सरकारनी बेटी बचाव, बेटी पढाओ व मुलीच्या जन्मदरात वाढ व्हावी व मुलीना राष्ट्रीय प्रवाहत सहभागी करून घेण्यासाठी नव नवीन कल्याणकारी योजना राबवित असून लाडली लक्ष्मी योजना, सुकन्या योजना, राजश्री योजना अश्या विविध योजनेचा लाभ मिळावा याकरीता शासन प्रयत्नशिल आहे व मुलींना प्रोत्साहित करीत आहेत. जनतेमध्ये याबाबत जनजागृती निर्माण करून व जनतेमध्ये चांगला संदेश जावा या उद्देशाने बेटी बचाव, बेटी पढाव याबाबत चित्रकला स्पर्धेचे आयोजन करून म.न.पा.नी चांगला योग साधला आहे. व बेटी बचाव, बेटी पढाओ अभियान अधिक प्रभाविपणे राबविण्यात यावा, या चित्रकला स्पर्धेच्या माध्यमातून बेटी बचाओ, बेटी पढाओ हा संदेश घरोघरी पोहचावा याकरीता प्रत्येकांनी स्वतःच्या घरून मुलींना व मातेला सन्मान दयावा, असे मनोगत मा. महापौर श्री. प्रवीण दटके व्यक्त केला.

नागपूर महानगरपालिका व बेटी बचाव, बेटी पढाओ अभियान समिती व विदर्भ कला शिक्षण संघ यांच्या संयुक्त विद्यमाने बेटी बचाव, बेटी पढाओ याबात म.न.पा. शाळाच्या विद्यार्थी करीता चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतील विजेत्या विद्याथ्र्यांना राजे रघुजी भोसले नगर भवन महाल येथे मा. महापौर श्री. प्रवीण दटके यांचे हस्ते बक्षिस वितरण करून गौरव  करण्यात आला.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून व्यासपीठावर आमदार मा.श्री. सुधाकर कोहळे, सत्तापक्षनेता श्री. दयाशंकर तिवारी, शिक्षण समितीचे सभापती श्री. गोपाल बोहरे, महिला बाल कल्याण समिती सभापती श्रीमती रश्मी फडणवीस, लक्ष्मीनगर झोन सभापती श्रीमती निलिमा बावणे, गांधीबाग झोन सभापती श्रीमती विद्या कन्हेरे, नगरसेविका श्रीमती दिव्या धुरडे, नगरसेविका श्रीमती वर्षा शामकुळे, उपायुक्त डॉ. रंजना लाडे, शिक्षणाधिकारी श्री. मो. फारूख अहमद खान, भाजपा नेते प्रा. श्रीकांत देशपांडे, माजी नगरसेविका नंदा जिचकार, कु. ज्योती आमगे, श्री. किशोर पलांदुरकर, मनिषा काशीकर, श्रीमती वर्षा चौधरी आदि मान्यवर आवर्जून उपस्थित होते.

यावेळी आमदार श्री. सुधाकर कोहळे म्हणाले की, मुलींच्या जन्मदरात घट होत असल्याबद्दल चिंता व्यक्त करून शासनानी महिलांच्या उत्कर्षासाठी विविध उपक्रम सुरू केले आहे त्याचा आवश्यक लाभ घ्यावा असे आवाहन केले.

सत्तापक्षनेता श्री. दयाशंकर तिवारी म्हणाले, आजचे बालक उद्याचे नागरीक आहेत. म.न.पा. व बेटी बचाव,



बेटी पढाओ अभियान समिती व म.न.पा. कला शिक्षकाच्या विशेष सहकार्याने हा कल्याणकारी उपक्रम राबविण्याबाबत सहभागी संस्थेचे अभिनंदन करून "बेटी बचाओंगे देश बचेगा, बेटी पढाओंगे देश पढेगा" याकरीता जन जागृती निर्माण करण्याकरीता झोन स्तरावर मुलींकरीता कार्यशाळेचे आयोजन करा. व जनतेमध्ये जागृती निर्माण करावी अशी सूचना केली.

नागपूर महानगरपालिका व म.न.पा. बेटी बचाव, बेटी पढाओ अभियान समिती व विदर्भ कला शिक्षक संघ यांचे संयुक्त विद्यमाने नागपूर महानगरपालिकेच्या शाळामध्ये "बेटी बचाव, बेटी पढाओ" आणि "अपनी देश की महान नारी" या विषयावर चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धेचे म.न.पा. च्या 182 शाळे मधील एकुण 13,802 विद्यार्थी सहभागी झाले होते. हि स्पर्धा तीन गटात आयोजित करण्यात आली होती.

पहिला गट - वर्ग 1 ते 5, दुसरा गट - वर्ग 6 ते 8, तिसरा गट - वर्ग 9 ते 12 अश्या तीन गटात हि स्पर्धा संपन्न झाली. म.न.पा. च्या दहाही झोन मधून प्रत्येकी 9 विद्यार्थी निवडण्यात आले. असे दहाही झोन मधून एकुण 90 विद्याथ्र्यांना मा. महापौर व उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते पुस्तके व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. तसेच चित्रकला स्पर्धेत महत्वाची भूमीका असणाऱ्या म.न.पा.च्या 10 कला शिक्षक सर्वश्री राजकुमार बोंबाटे, श्री. राजेंद्र मसराम, श्री. रवि खंडाईत, श्री. संजय चिंचखेडे, श्री. राजेंद्र भुते, श्री. हेमंत वाघ, श्री. संजय समरीत, श्री. विनोद मानकर, श्री. अमित बंसोड व उमेश पवार यांचे यावेळी मा. महापौर श्री. प्रवीण दटके, आमदार श्री. सुधाकर कोहळे, सत्तापक्षनेता श्री. दयाशंकर तिवारी व गोपाल बोहरे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बेटी बचावो, बेटी पढाओ अभियान समितीच्या अध्यक्षा श्रीमती मनिषा काशीकर, संचालन श्रीमती प्रतिभा वैरागडे तर शेवटी आभार शाळा समन्वयक श्री. सुधीर कोरमकर यांनी केले.

पाहुण्यांचे स्वागत उपायुक्त श्रीमती रंजना लाडे व शिक्षणाधिकारी श्री. मो. फारूख अहमद खान यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यास्तव अभियान समितीच्या सर्वश्री अनिता काशीकर, सोनाली घोडमारे, संतोष लड्ढा, यशोधरा टेंभूर्णे, वैशाली सोनवणे आदींनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमला बहुसंख्य शाळेचे विजेते विद्यार्थी, मुख्याध्यापक, शिक्षक व स्वयंसेवी संस्थेचे महिला पदाधिकारी मोठया संख्येनी उपस्थित होते. या कार्यक्रमाला विशेष आकर्षण म्हणून नागपूर शहराचे जगात नावलौकिक करणारी कु.ज्योती आमगे हिने जगातील सर्वात कमी उंचीची मुलगी म्हणून गिनिज बुक ऑफ वल्र्ड रेकॉर्ड मध्ये नोंद झालेली आहे. तिच्या समवेत तिचे वडील श्री. किशन आमगे व आई अर्चना आमगे सुद्धा आवर्जुन उपस्थित होत्या.

# शिक्षकांनी विद्यार्थामधील सुप्त गुण ओळखुन त्याचा सर्वांगिण विकास साधावा: मा.उपमहापौर

शिक्षक दिना निमित्त सहा आदर्श शिक्षकांचा सत्कार तसेच सर्वच शिक्षकांना प्रशस्ती प्रमाणपत्र देऊन गौरव. शिक्षकी पेशा हा नोकरी किंवा व्यवसाय नसून ते पुण्याचे काम आहे. नागपूर म.न.पा. मध्ये आजही तन-मन-धनाने ज्ञानदानाचे कार्य करणारे शिक्षक आहेत. त्यामुळे शिक्षकांनी आत्मपरिक्षण करून आपण कुठे कमी पडतो हे पहावे तसेच आपल्या प्रतिभेचा पुरेपुर वापर करून शाळेची उन्नती करावी व विद्यार्था मधील असलेले सुप्त गुण ओळखुन त्यांचा सर्वांगिण विकास घडवून त्यांना प्रोत्साहित कराव तसेच पटसंख्या वाढीसाठी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवा, असे आवाहन मा. उपमहापौर श्री.सतिश होले यांनी केले.




नागपूर महानगरपालिका शिक्षण विभागाच्या वतीने आज दिनांक 3 सप्टेंबर, 2016 रोजी विदर्भ साहित्य सांस्कृतिक संघ, स्कुल झाशीराणी चौक स्थित सभागृहात येथे आयोजित शिक्षक दिन समारंभात कार्यक्रमाचे अध्यक्षपदावरून मार्गदर्शन करतांना मा. उपमहापौर बोलत होते. यावेळी व्यासपीठावर सत्तापक्षनेता श्री. दयाशंकर तिवारी, शिक्षण समिती सभापती श्री. गोपाल बोहरे, महिला बालकल्याण समितीच्या सभापती श्रीमती रश्मी फडणवीस, शिक्षण समिती उपसभापती श्रीमती दिव्या धुरडे, धंतोली झोन सभापती श्रीमती सुमित्रा जाधव, नगरसेविका श्रीमती संगिता गिऱ्हे, नगरसेविका श्रीमती लता यादव, अपर आयुक्त श्री.रविन्द्र कुंभारे, उपायुक्त श्रीमती डॉ. रंजना लाडे, शिक्षणाधिकारी मो.फारूख अहमद खान, शिक्षक संघाचे अध्यक्ष राजेश गवरे, प्रमुख सचिव देवराव मांडवकर, कोशाध्यक्ष श्रीमती मलविंदर कौर लांबा आदि विराजमान होते.

यावेळी मार्गदर्शन करतांना सत्तापक्षनेता श्री. दयाशंकर तिवारी म्हणाले, आजचा दिवस हा चांगल्या कामांचा संकल्प करण्याचा दिवस आहे व आदर्श शिक्षकांचासुध्दा सत्कार होत आहे हा आपल्यासाठी आनंदाचा दिवस आहे. शिक्षकांनी शाळेची पटसंख्या वाढविण्यासाठी आपण काय प्रयत्न केले याचे आत्मपरिक्षण सुधारणा करावी, असे आवाहन केले. म.न.पा.शाळेच्या विद्यार्थीनी राज्य व राष्ट्रीय स्तरावरील विविध स्पर्धेत सहभागी होऊन म.न.पा.चा नांव लौकीक केलेला आहे. त्याबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून म.न.पा.शाळेचे विद्यार्थी आज कुठेही मागे नाहीत. असे मनोगत व्यक्त करून शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्यात.

मार्गदर्शन करतांना शिक्षण समिती सभापती श्री.गोपाल बोहरे म्हणाले, शिक्षक हा समाजाचा कणा आहे, शिक्षक हे ज्ञानार्जनाचे कार्य करतात व सुसंस्कारित विद्यार्थी घडवितात त्यामुळे आदर्श शिक्षकांसोबतच म.न.पा.च्या सर्वच

शिक्षकांचा गौरव करून प्रोत्साहित देऊन त्याचे मनोबल वाढविणे गरजेचे आहे. याकरीता सर्व शिक्षकांना प्रशस्तीपत्र देऊन पुरस्कृत करण्यात येणार आहे. पटसंख्या कमी होण्याची कारणे शोधण्याचा दिवस आहे, आज आदर्श शिक्षकांच्या नावाची घोषणा होणार आहे, पारदर्शकता ठेवून पॅनल तयार करून निवड समितीचे 6 आदर्श शिक्षकांची निवडकेलेली आहे, निवड करतांना पारदर्शकता व निकष ठरवूनच नावे निश्चित करण्यात आल्याचे आवर्जुन सांगुण सर्वच शिक्षकांचे त्यांनी प्रशंषा करून शिक्षक दिनाचे शुभेच्छा दिल्यात.




अपर आयुक्त श्री.रविन्द्र कुंभारे म्हणाले, आजचे युग हे संगणक व स्पर्धेचे युग आहे, स्वतःची क्षमता वाढविली पाहिजे व गुरूजनाबद्दल आदर ठेवून स्वतःमध्ये परिवर्तन घडवून आणा माझी संस्था माझी शाळा या भावनेतुन विद्यार्जनाचे कार्य करावे, असे मनोगत व्यक्त केला.

म.न.पा.शिक्षक संघाचे अध्यक्ष श्री.राजेश गवरे म्हणाले, शिक्षण समिती सभापती श्री.गोपाल बोहरे यांनी शिक्षण विभागाच्या प्रत्येक समस्यांकडे व शाळेच्या व विद्याथ्र्यांचा कल्याणासाठी निरंतर श्रम देऊन शिक्षण विभागाच्या प्रगती करीता ते स्वतः पाठपूरावा करतात याबाबत गोपाल बोहरे यांचे त्यांनी कौतुक करून शिक्षकांच्या विविध प्रलंबित समस्येकडे मान्यवरांचे लक्ष वेधून ते त्वरित मार्गी लावण्याची विनंती केली.

यावेळी उपायुक्त श्रीमती रंजना लाडे यांनीसुध्दा आपले मनोगत व्यक्त केले.

**आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक**

1. श्रीमती शिल्पा खंनगन - स्व.साणे गुरूजी उ.प्रा.शाळा
2. श्री. किशोर संकूलवार - बस्तरवारी मा.शाळा
3. श्रीमती छाया कलसुआ - कळमना मराठी उ.प्रा.शाळा
4. श्रीमती खिलहत जहा खान - संजयनगर हिन्दी प्रा.शाळा
5. सुश्री आशा रामानी - वैशालीनगर हिन्दी प्रा.शाळा
6. श्रीमती कहकशा जबीन - पेंशननगर उर्दु मा.शाळा

या आदर्श शिक्षकांचा मा.उपमहापौर श्री.सतिश होले, सत्तापक्ष नेते श्री.दयाशंकर तिवारी, शिक्षण समितीचे सभापती श्री.गोपाल बोहरे यांचे हस्ते शाल, श्रीफळ, गौरवचिन्ह व तुळशीचे रोपटे देवून गौरव करण्यात आला.

त्याचप्रमाणे 2012 वर्षीच्या आदर्श शिक्षकांचा सुद्धा प्रशस्तीपत्र देवून गौरविण्यात आले तसेच म.न.पा.सेवेतून सेवानिवृत्त 40 शिक्षकांचाही सुद्धा यावेळी मान्यवरांच्या हस्ते शाल श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला. त्याप्रमाणे शिक्षक दिनानिमित्त म.न.पा. शाळेतील सर्वच शिक्षकांना प्रोत्साहित करण्यासाठी प्रशस्तीपत्राचे वितरण त्या-त्या शाळेचे मुख्याध्यापक यांना सुर्पूत करण्यात आले. नंतर मुख्याध्यापक हे प्रशस्तीपत्र सर्व शाळेतील शिक्षकांना प्रार्थनेच्या वेळी वितरीत करणार आहेत.

प्रारंभी मान्यवरांनी व्दिप प्रज्वलन केल्यानंतर डॉ.सर्वपल्ली राधाकृष्ण व विद्येची देवता सरस्वती यांचे फोटोला माल्यार्पण केले. यावेळी बॅरि.शेषराव वानखेडे विद्यानिकेतनच्या विद्यार्थीनींनी शारदा स्तवन व स्वागत गीत सादर केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षणाधिकारी मो.फारूख अहमद खान यांनी केले व सर्व उपस्थित मान्यवरांचे उपायुक्त डॉ.रंजना लाडे व शिक्षणाधिकारी श्री.फारूख अहमद खान यांनी तुळशीचे रोपटे दूवन स्वागत केले. संचालन गुणवत्ता कक्षाचे प्रमुख श्रीमती प्रतिभा लोखंडे यांनी केले तर शेवटी आभार प्रदर्शन सहा.शिक्षणाधिकारी श्रीमती मिना गुप्ता यांनी मानले. राष्ट्रगिता नंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# फेज- I सिमेंट रस्त्यांची कामे 31 डिसेंबर 2016 पर्यंत पूर्ण करावी व फेज - II च्या कामात गती आणावी: मा. महापौर श्री. प्रवीण दटके यांचे निर्देष

नागपूर शहरात सुरू असलेल्या सिमेंट काँक्रिट रस्ते प्रकल्पा संदर्भात मा. महापौर द्वारा आढावा. नागपूर शहरातील रस्ते सिमेंट काँक्रिटचे करण्याकरीता फेज- I ची जी कामे सुरू आहेत ती सर्व कामे 31 डिसेंबर 2016 पर्यंत पूर्ण करा व फेज- II कामात गती आणण्याचे सक्त निर्देश मा. महापौर श्री. प्रवीण दटके यांनी दिलेत.

नागपूर शहरात सुरू असलेल्या सिमेंट काँक्रिट रस्ते प्रकल्पासंबंधी आढावा बैठक आज शनिवार दिनांक 17.09.2016 रोजी दुपारी 12.00 वाजता नागपूर महानगरपालिकेच्या सिव्हील कार्यालयातील स्व.डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात मा. महापौर श्री. प्रवीण दटके यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

या बैठकीला मा. सभापती स्थायी समिती श्री. सुधीर (बंडु) राऊत, स्थापत्य विद्युत व प्रकल्प विशेष समितीचे सभापती श्री. सुनील अग्रवाल, परिवहन सभापती श्री. नरेंद्र (बाल्या) बोरकर, मुस्लीम लिग गटनेते श्री. असलम खान, दुर्बल घटक समिती अध्यक्ष श्री. राजू लोखंडे, अपर आयुक्त डॉ. आर.झेड. सिद्दीकी, मुख्य अभियंता श्री. उल्हास देबडवार, शहर अभियंता श्री. मनोज तालेवार, कार्यकारी अभियंता (प्रकल्प) श्री. नरेंद्र बोरकर, कार्यकारी अभियंता सर्वश्री महेश गुप्ता, श्री. एम.जी. कुकरेजा यांच्यासह कामांच्या एजन्सी/कंत्राटदारांचे प्रतिनिधी सुद्धा बैठकीस प्रामुख्याने उपस्थित होते.

बैठकीच्या प्रारंभी मा. महापौरांनी शहरात सुरू असलेल्या सिमेंट रोड फेज- I ची काय स्थिती आहे याबाबत विचारणा केली असता 6 रस्त्यांची कामे पूर्ण झाली असल्याची माहिती देण्यात आली, जे रस्ते ड्राप करण्यात आले आहेत ते सोडून उर्वरित सर्व रस्ते 31 डिसेंबर 2016 पर्यंत पूर्ण करण्यात यावेत त्याचप्रमाणे पोलीस विभागाच्या वाहतुक शाखेकडून सिमेंट रस्त्याच्या कामात नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त होण्यास विलंब होत असल्यास प्रत्यक्ष संपर्क साधण्याचे देखील निर्देश मा. महापौर यांनी दिलेत.

तद्नंतर मा. महापौरांनी सिमेंट काँक्रीट रस्ते फेज- II संदर्भात आढावा घेतला असता शहर अभियंता श्री. मनोज तालेवार यांनी माहिती देतांना सांगितले की, सिमेंट रस्ता टप्पा- 2 (फेज- II) प्रकल्प शिघ्र गतीने व विहित कालावधीत पूर्ण होण्याचे दृश्टीने 55 रस्तांचे एकुण 22 पॅकेजेस तयार करण्यात आले असून, यास स्थायी समितीची मान्यता प्राप्त आहे. यापैकी 13 पॅकेजेस करिता कार्यादेश देण्यात आले असून ती कामे सुरू आहेत. दोन पॅकेज करीता कार्यादेश प्रक्रिया सुरू असून तीन पॅकेजच्या निविदा स्थायी समितीचे मंजुरी करीता सादर करण्यात येत आहे. उर्वरित पॅकेज करीता निविदा मंजूरीची प्रक्रीया सुरू असल्याची माहिती त्यांनी यावेळी बैठकीत दिली.

शहरातील रस्ते चांगले असावे याद्दश्टीने सिमेंट रस्तांची कामे गतीने करावी. कामात काही अडचणी किंवा समस्या उद्भवत असल्यास त्वरीत सांगावे, जास्तीत-जास्त मनुष्यबळ लावून वेळेच्या आत कामे पूर्ण करावी. कुठलीही कामे रखडली जाणार नाही, याची दक्षता घ्यावी असेही निर्देश मा. महापौरांनी बैठकीत दिलेत.

बैठकीत परिवहन समिती सभापती श्री. नरेंद्र (बाल्या) बोरकर, मुस्लीम लिग पक्षनेता श्री. असलम खान, दुर्बल घटक समिती अध्यक्ष श्री. राजू लोखंडे यांनी आपल्या प्रभागातील सिमेंट रस्त्यांच्या समस्या बैठकीत मांडल्यात.

# मतदार जागृती अभियान अधिक गतीने राबवा....आयुक्त श्री.श्रावण हर्डीकर

मतदार जागृती अभियान अधिक गतीने राबविण्यासंदर्भात महाविद्यालयांच्या प्राचार्या समवेत आयुक्तांनी घेतली बैठक.

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2017 मतदार जागृती अभियान अधिक गतीने राबवून प्रत्येक महाविद्यालयाने आपल्या महाविद्यालयातील 18 वर्षे पूर्ण झालेला विद्याथ्र्याचा मतदार नोंदणी अर्ज क्रं.6 भरून त्यांना मतदार करण्यासाठी मतदार जागृती अभियान अधिक गतीने राबविण्यात यावे असे आवाहन म.न.पा.आयुक्त श्री.श्रावण हर्डीकर यांनी केले.

राज्य निवडणूक आयुक्त यांनी महानगरपालिका क्षेत्रातील महाविद्यालयामध्ये मतदार जागृती अभियान अंतर्गत अर्ज स्वीकृती केंन्द्र उघडण्याचे निर्देश दिलेले आहे त्या अनूषंगाने आज दिनांक 12.09.2016 रोजी दुपारी 12.00 वाजता म.न.पा.च्या छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय ईमारतीतील सभागृहात शहरातील सर्व महाविद्यालयाच्या प्राचार्यांची व संबंधीतांची सभा मा.आयुक्तांचे उपस्थितीत संपन्न झाली.

यावेळी अपर आयुक्त श्री.रविन्द्र कुंभारे निवडणूक नोडल अधिकारी उपायुक्त डॉ.रंजना लाडे, उपायुक्त श्री.रवींन्द्र देवतळे, सहा.आयुक्त श्री.प्रकाश वराडे, जनसंपर्क अधिकारी श्री.अशोक कोल्हटकर आदी उपस्थित होते. तसेच यावेळी शहरातील महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व त्यांचे प्रतिनिधीसुध्दा आवर्जुन उपस्थित होते.

बैठकीत आयुक्त पुढे म्हणाले की, प्रत्येक महाविद्यालयाने 16 सप्टेंबर 2016 ते 14 ऑक्टोंबर 2016 दरम्यान मतदार नोंदणी जागृती अभियान राबविण्यात येणार आहे. प्रत्येक महाविद्यालयाने आपल्या महाविद्यालयात 1 जानेवारी 2016 रोजी जे विद्यार्थी 18 वर्षाचे होतील त्यांचे मतदार नोंदणी अर्ज क्रं.6 भरून मतदार यादीमध्ये नांव समाविष्ठ करण्याची कार्यवाही करावी. म.न.पा.तर्फे माहिती पत्रक व फ्लॅक्स उपलब्ध करून देण्यात येणार आहे.



# समाजातील शेवटच्या स्तरातील दीन जनाचे कल्याण हेच पंडित दीनदयालजींचे अंतिम ध्येय होते: महापौर प्रवीण दटके



पं.दीनदयाल उपाध्याय यांच्या तैलचित्राचे म.न.पा.मध्ये अनावरण. “ज्या दिवशी आपण गरिबांना पक्की घरे देऊ, ज्या दिवशी आपण त्यांच्या मुलांना शिक्षित करू आणि ज्या दिवशी आपण त्यांना काम देऊन त्यांचा जीवनस्तर उंचावू त्या दिवशी आपली मातृभक्ती खऱ्या अर्थानी व्यक्त होईल”, अशी पं.दीनदयाल उपाध्याय यांची धारणा होती. त्यामुळे समाजातील शेवटच्या स्तरातील दीन जनाचे कल्याण हेच पंडितजींच्या जीवनाचे अंतिम ध्येय होते, असे प्रतिपादन महापौर प्रवीण दटके यांनी व्यक्त केले.

एकात्म मानववादाचे प्रणेते, भारतीय संस्कृतीचे गाढे अभ्यासक व विचारवंत तसेच तत्कालीन भारतीय जनसंघाचे माजी अध्यक्ष पं.दीनदयाल उपाध्याय यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून आज दि. 25 सप्टेंबर, 2016 रोजी त्यांच्या जयंती दिनी सकाळी नागपूर महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज नवीन प्रशासकीय इमारतीतील दालनात पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या तैलचित्राचे अनावरण महापौर श्री.प्रवीण दटके यांचे शुभहस्ते करण्यात आले. यावेळी माजी महापौर व आमदार प्रा.अनिल सोले, दक्षिण नागपूरचे आमदार व शहर भा.ज.पा.अध्यक्ष श्री.सुधाकर कोहळे, स्थायी समिती अध्यक्ष श्री.सुधीर (बंडु) राऊत, सत्तापक्ष नेता श्री.दयाशंकर तिवारी, आयुक्त श्री.श्रावण हर्डीकर, निगम सचिव श्री.हरिश दुबे, कार्य.अभियंता डी.डी.जांभुळकर, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.प्रदीप दासरवार, शाखा अभियंता श्रीकांत देशपांडे, म.न.पा.राष्ट्रीय नागपूर कार्पोरेशन कर्मचारी युनियनचे सुरेन्द्र टिंगणे, विजय फडणवीस, राजु मेश्राम, राकेश चाहांदे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन सहा.जनसंपर्क अधिकारी श्री.प्रदीप खर्डेनवीस यांनी केले.

# घनकचरा व्यवस्थापनासह विविध प्रकल्पांसाठी तांत्रिक सहकार्य करावे: महापौर प्रवीण दटके

ICLEI, South Asia, GIZ आणि म.न.पा.मध्ये त्रिपक्षीय सामंजस्य करार. नागपूर शहराचा झपाटयाने विकास होत असून येथील जनतेला जास्तीत-जास्त नागरी सोयी सुविधा देण्यासाठी नागपूर महानगरपालिका प्रयत्नशील असून शहराला मा. मुख्यमंत्री श्री.देवेन्द्र फडणवीस तसेच नागपूरचे खासदार व मा.केन्द्रीय परिवहन मंत्री श्री.नितीन गडकरी यांच्या रूपाने समर्थ राजकीय नेतृत्व लभलेले असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली शहर स्मार्ट सिटीकडे वाटचाल करीत आहे. त्याद्दृश्टीने घनकचरा व्यवस्थापन, मलनिस्सारण प्रकल्प व जलशुद्धीकरण या प्रकल्पासह (MSW, STP & WTP) सौर उर्जा (Solar Energy) क्षेत्रात आपले तांत्रिक सहकार्य अपेक्षित असल्यामुळे आजच्या त्रिपक्षीय सामंजस्य करारामुळे हे उद्दीश्ट साध्य होईल, असा विश्वास मा. महापौर श्री. प्रवीण दटके यांनी व्यक्त केला.

ICLEI, South Asia या संस्थेनी भारतातील 11 शहरांपैकी नागपूर व राजकोट या दोन शहरांची 'Integrated Resource Management in India Cities' The Urban Nexus या प्रकल्पांतर्गत निवड केली आहे. या प्रकल्पांच्या पूर्ततेसाठी इक्ली साऊथ एशिया (ICLEI South Asia) जर्मन सरकारच्या सहकार्याने जी.आय.झेड (GIZ) आणि नागपूर महानगरपालिका (NMC) यांच्या दरम्यान आज दिनांक 26 सप्टेंबर, 2016 रोजी सकाळी 11.00 वाजता महापौर श्री. प्रवीण दटके यांच्या प्रमुख उपस्थितीत म.न.पा.च्या छत्रपती शिवाजी महाराज नवीन प्रशासकीय इमारतीतील सभाकक्षात त्रीपक्षीय सामंजस्य करार करण्यात आला. नागपूर महानगरपालिकेतर्फे आयुक्त श्री.श्रावण हर्डीकर, ICLEI, South Asia तर्फे कार्यकारी संचालक श्री. इमानी कुमार तर जी.आय.झेड (GIZ) तर्फे प्रकल्प संचालक श्रीमती रूथ अर्लबेक यांनी स्वाक्षरी केली व त्यानंतर करारनाम्याचे अदान-प्रदान करण्यात आले.

यावेळी उपमहापौर श्री.सतीश होले, स्थायी समिती सभापती श्री.सुधीर (बंडु) राऊत, GIZ चे तांत्रिक प्रकल्प संचालक रॅल्फ ट्रॉस, इयूवेले (EU WELLE) चे तांत्रिक विषेशज्ञ हयुबर्ट वायनॅन्डस केंद्र सरकारच्या घनकचरा व्यवस्थापन सल्लागार श्रीमती रागिणी जैन, म.न.पा.चे उपायुक्त श्री.रविन्द्र देवतळे, अधिक्षक अभियंता (जलप्रदाय) दिलीप जामगडे, कार्य.अभियंता (जलप्रदाय) श्री. संजय गायकवाड, कार्य.अभियंता (पेंच प्रकल्प) अनिरूद्ध चैगंजकर, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.प्रदीप दासरवार, उप अभियंता प्रदीप राजगीरे, उप अभियंता राजेश दुपारे आदी उपस्थित होते.

यावेळी इयुवेलेतर्फे तांत्रिक विशेषज्ञ हयुबर्ट वायनॅन्डस यांनी पॉवर पॉईंट सादरीकरणाव्दारे Maximum Yield Technology (MYT) तंत्रज्ञानाबाबत माहिती दिली. जी.आय.झेड ने चीन, थायलंडमध्ये आपली तांत्रिक सेवा घनकचरा व्यवस्थापनाकरीता दिली आहे. या क्षेत्रात त्यांची नैपुण्य प्राप्त केले आहे. शास्त्रोक्त पध्दतीने घनकचऱ्याची विल्हेव्हाट लावून कचरा हा टाकाऊ नसुन ते उत्पन्नाचे साधन करून दाखविण्यात आले आहे. याकरीता ते नागपूर शहराला सेवा देण्यास उत्सुक आहे. कचऱ्यावर प्रक्रीया करून बायोगॅस निर्मीती, इंधन निर्मिती व विद्युत निर्मिती करून ते एक उत्पन्नाचे साधन होईल. त्या दृश्टीने नागपूर शहरातील कचऱ्याची गुणवत्ता तपासणार आहेत. त्यामध्ये घनकचऱ्याची शास्त्रशुध्द पध्दतीने विल्हेवाट लावतांना कार्बनचे कमीत कमी उत्सर्जन करून विद्युत निर्मिती कशी करता येईल याची

देखील माहिती दिली.

आयुक्त श्री. श्रावण हर्डीकर यांनी प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत सर्वांसाठी घरे ही संकल्पना राबवितांना शहरातील गरिबांची निवाऱ्याची मोठी समस्या लक्षात घेवून शहरात किमान 70 हजार लोकांना परवडणाऱ्या कमी खर्चातील घराची आवश्यकता आहे. त्यादृश्टीने बांधकाम क्षेत्रात कमी खर्चाच्या घरांना (Affordable House) मागणी असून येत्या 2 ते 5 वर्षात किमान 50 हजार घरे उपलब्ध करून देण्याचा केन्द्रीय परिवहनमंत्री व नागपूरचे खासदार श्री.नितीन गडकरी यांचा मानस आहे, असे सांगितले. तसेच शहरातील कचरा गोळा करतांना घन कचरा, द्रव कचरा, हरित कचरा वेगवेगळा गोळा करणे व CNG Waste वेगळा करून विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. तसेच त्यासाठी Sustainable कचरा दिला पाहिजे असे सांगितले.

GIZ च्या प्रकल्प संचालक श्रीमती रूथ अर्लबेर्क यांनी त्रिपक्षीय सामंजस्य कराराबद्दल आनंद व्यक्त करून तांत्रिक क्षेत्रात सहाकार्य करण्यास त्यांची संस्था उत्सुक असून आवश्यक असल्यास याबाबत संबंधित म.न.पा. अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची तयारी त्यांनी दर्शविली.



# मा.महापौर व आयुक्त यांनी दीक्षाभूमी परिसरातील व्यवस्थेची पाहणी करून घेतला आढावा



म.न.पा. च्या वतीने माताकचेरी, आय.टी.आय दिक्षाभूमी परिसरात 800 अस्थायी संडास, 100 स्नानगृहे उभारणार, सी.सी.टी.व्ही.कॅमेरे लावणार. भाविकांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची काळजी घेण्याचे महापौरांचे निर्देश

लाखो बौध्द भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या पवित्र दिभाभूमी परिसरात नागपूर महानगरपालिकेतर्फे करण्यात आलेल्या सोयी-सुविधा व व्यवस्था याबाबत आज दि. 26 सप्टेंबर 2016 रोजी मा. महापौर श्री.प्रवीण दटके, स्थायी समिती सभापती श्री. सुधीर राऊत व म.न.पा.आयुक्त श्री.श्रावण हार्डिकर व दिक्षाभूमी स्मारक समितीचे सचिव श्री.सदानंद फुलझेले यांनी पदाधिकारी अधिकारी समवेत दिक्षाभूमी परिसराचे निरीक्षण केले व व्यवस्थे संदर्भात आढावा बैठक घेतली.

यावेळी मा. महापौर समवेत स्थापत्य समितीचे सभापती श्री. सुनिल अग्रवाल, आरोग्य समितीचे सभापती श्री.देवेन्द्र मेहर, शिक्षण समिती सभापती श्री. गोपाल बोहरे, धंतोली झोन सभापती श्रीमती सुमित्रा जाधव, धरमपेठ झोन सभापती श्रीमती वर्षा ठाकरे, अपर आयुक्त श्री. रविंद्र कुंभारे, अपर आयुक्त डॉ. आर.झेड.सिद्दीकी, मुख्य अभियंता श्री. उल्हास देबडवार, स्मारक समितीचे सदस्य श्री. वसंतराव चिकाटे, नगरयंत्री श्री. मनोज तालेवार, कार्यकारी अभियंता सर्वश्री. संयज गायकवाड, दिलीप जामगडे, व्ही.आर.रेवतकर, आरोग्य अधिकारी डॉ. सविता मेश्राम, डॉ. प्रदीप दासरवार व इतर अधिकारी उपस्थित होते.

यानंतर मा. महापौर यांनी सर्व पदाधिकारी व अधिकारी समवेत दिक्षाभुमी स्तुप परीसारातील मुख्य समारोह स्थळ तसेच माता कचेरी, आय.टी.आय. परिसर, अंधविद्यालय व श्रद्वानंद पेठ मार्ग याची पाहणी करुन व्यवस्थेचे निरिक्षण केले. नागपूर महानगरपालिकेतर्फे भाविकांच्या मुलभुत सोयीसोबतच आय.टी. आय. व अंधविद्यालय परिसरात 800 अस्थायी संडास, 100 स्नानगृहे व मुत्री घरांची सोय तसेच आय.टी.आय. समोर भव्य शामियाना उभारुन अस्थायी निवासाची सोय करण्यात येत आहे. तसेच या सर्व जागेची मा. महापौरांनी प्रत्यक्ष घटना स्थळी जाऊन व्यवस्थेचा आढावा घेतला. यावेळी मा. महापौरांनी असे निर्देश दिले कि, अस्थायी शौचालय व मुत्री घराची पाईप लाईन चा उतार व्यवस्थीत करा जेणे करुन पाईप लाईन चोकेज होणार नाही व स्वच्छ राहिल. परिसरात घान साचनार नाही या बाबत दक्षता घेण्यास

संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले. तसेच जलप्रदाय विभागातर्फे दिक्षाभूमी परिसरात 24 तास पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व दिक्षाभुमी च्या चारही बाजुंनी पाण्याचे टँकर सज्ज ठेवण्या संदर्भात कार्यकारी अभियंता जलप्रदाय व ओ.सी.डब्ल्यूच्या अधिकाऱ्यांना दिले.

जलप्रदाय विभागातर्फे दिक्षाभूमी परिसरात 220 अस्थायी नळे लावण्यात येत आहे. दिक्षाभूमी परिसरात विद्युत विभागाने सतर्कता घेऊन दिक्षाभूमी परिसराचे चाहरी बाजूकडील मुख्य रस्त्यांवरील स्ट्रिट लाईट दुरुस्त करुन जनरेटर ठेवण्यात यावे. विद्युत टावर उभारा. असे निर्देश मा. महापौरांनी कार्यकारी अभियंता विद्यृत यांना दिले. तसेच 7 जनरेटर व दिक्षाभूमीच्या चारही चौकात व कार्यक्रम ठिकाणी सी.सी.टी.व्ही.कॅमेरे लावण्यात यावे सर्व कॅमेरेचे टेस्टींग करून घ्या असेही निर्देश दिलेत. सामान्य प्रशासन विभागातर्फे सूरक्षा गार्ड तत्पर ठेवा व म.न.पा.तर्फे नियंत्रण कक्ष उभारून संबंधीत अधिकाऱ्यांचे नांव व मोबाईल क्रमांकाचे नावाचे फलक नियंत्रण कक्षात लावण्यासंदर्भात निर्देश दिलेत. तसेच फुड झोनकरीता जागा निश्चित करा. रस्त्यावर खड्डे असलेल्या रस्त्यांची डागडूजी करून पॅचेश भरा, जागेची लेवलींग करा, असे निर्देश मुख्य अभियंता श्री. उल्हास देबडवार यांना दिले.

स्वच्छतेच्या संदर्भात आरोग्य विभागातर्फे दिक्षाभूमी परिसर स्वच्छ राहावा याकरिता कचरापेटी (डस्टबिन), कंटेनर, कचराटप, मोबाईल टॉयलेट आणि टॉयलेट ला जाण्यासाठी भाविकांना पाणी सहज घेता येईल याकरिता प्रत्येक टॉयलेट जवळ छोटया प्लास्टीकच्या बादल्या ठेवा व नळ जोडणी करा तसेच दिक्षाभूमी परिसरातील दुकानदार, चहा हॉटेल व स्टॉल वाल्यांना दुकानातील कचरा प्लेट, प्लास्टिक हे कचरा कुंडीतच टाकण्यासंदर्भात सुचना द्या जेणे करुन रस्त्यावर व फुटपाथवर कचरा साचनार नाही तसे संपुर्ण परिसरात किटकनाशक औषधाची फवारणी करा व कचरा कुंडीची संख्या वाढवा असे निर्देश आरोग्य अधिकारी डॉ. प्रदीप दासरवार व कणक रिर्सोससेचे श्री. कमलेश शर्मा यांना दिले. परिसरातील मोठया प्रमाणात गवत व झाडे झूडपे वाढल्यामुळे जे.सी.बी. मशिन लाऊन संपुर्ण परिसर स्वच्छ करण्याच्या संदर्भात आरोग्य अधिकारी डॉ. प्रदिप दासरवार यांना निर्देश दिलेत. अग्निशमक विभागातर्फे फायर टेंडर अग्निशमन विभागाच्या गाडया चारही बाजूला ठेवा व आपत्ती व्यवस्थापण नियोजनपूर्वक ठेवण्याचे निर्देश अग्निशामक अधिकाऱ्यांना दिले. तसेच म.न.पा. नियंत्रण कक्षा जवळ व पोलीस व फायर कंट्रोल कक्षाजवळ 108 हि अत्याधुनिक आकस्मीत रूग्णवाहिका सेवा तत्पर ठेवा असेही निर्देश मा. महापौर यांनी दिले.

यावेळी मा.महापौर यांनी दिक्षाभूमी स्मारक समितीच्या कार्यालयात स्मारक समितीचे सचिव मा.श्री.सदानंद फुलझेले सदस्य विजय चिकाटे यांचे समवेत स्थायी समिती सभापती श्री. सुधीर (बंडु) राऊत व म.न.पा.आयुक्त श्री.श्रावण हर्डिकर व म.न.पा.च्या सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत व स्मारक समितीच्या पदाधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन चर्चा केली. दिक्षाभूमीवर येणाऱ्या लाखो भाविकांना म.न.पा.तर्फे मूलभूत सूख सूविधा पूरवा विभाग प्रमुखांना दिलेली जबाबदारी वेळेच्या आत पूर्ण करा. हे सर्व विविध कामे व सुखसुविधा वेळेच्या आत पुर्ण करा जेणे करुन दिक्षाभूमीवर येणाऱ्या भाविकांना कोणताही त्रास होऊ नये याची काळजी घेण्याचे संबंधित विभाग प्रमुखांना मा. महापौर श्री.प्रवीण दटके यांनी निर्देश दिले.

यावेळी महापौरांसमवेत सहा. आयुक्त श्री. सुभाष जयदेव, सहा. आयुक्त श्री. महेश मोरोणे, जनसपंर्क

अधिकारी श्री. अशोक कोल्हटकर, हॉटमिक्स प्लांट विभागाचे अभियंता श्री. उज्वल लांजेवार, कणक रिर्सोसेस मॅनेजमेंटचे श्री. कमलेश शर्मा, ओ.सी.डब्ल्यूचे श्री. कॉलरा, आंबेडकर महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री. प्रा.ए.पी. जोशी, उपप्राचार्य श्री. कबीर राऊळकर, उपअभियंता श्री. किशोर खात्री, उपअभियंता श्री.मनोज गणवीर, उपअभियंता श्री.वाटपाडे, विद्युत अभियंता तारापूरे, झोनल अधिकारी श्री.पी.टी.टेंभेकर, श्री.निलु भगत व संबंधीत विभागाचे बहूसंख्य अधिकारी उपस्थित होते.